# गुरूदेव रानडे

प्रा. नीला बोडस

डॉ. रा. द. तथा गुरूदेव रानडे हे विसाव्या शतकातील उच्चविद्याविभूषित विद्वान पंडित असूनही आध्यात्मिक क्षेत्रातील साक्षात्कारी संत गुरूदेव म्हणून ओळखले जातात. शिक्षण, विद्यार्जन यांना प्रोत्साहन देणारे वातावरण असलेल्या जमखंडी या गावी इ. स. १८८६ मध्ये त्यांचा जन्म झाला. पदवी आणि त्यापुढचे शिक्षण यासाठी ते पुण्याला आले. त्या काळात ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली असूनही गुरूकुलासारखे वातावरण असलेल्या डेक्कन कॉलेज या नामांकित संस्थेत ते दाखल झाले. त्यांना संस्कृत, तत्वज्ञान यासारख्या विषयात उत्तम गती असूनही त्यांनी पदवीसाठी गणित विषय निवडला. या काळात तेथील प्रा. बेन, प्रो. शार्प, प्रो. वुडहाऊस यांच्यासारख्या गुणग्राहक विद्वान प्राध्यापकांचा त्यांच्यावर प्रभाव पडला. विशेषत: प्रो. बेन यांच्यामुळे भाषा, साहित्य, विज्ञान, तत्वज्ञान यासारख्या विषयात मूलगामी अभ्यास करण्याची आवड, शोधक व जिज्ञासू वृत्ती त्यांच्यात निर्माण झाली. त्यापूर्वी १९०१ साली उमदीच्या भाऊसाहेब महाराजांकडून त्यांना पारमार्थिक दीक्षा मिळाली होती. त्यानुसार त्यांची साधनाही चालू होती. पदव्युत्तर शिक्षणासाठी संस्कृत किंवा गणित यापैकी काय निवडावे याचा निर्णय होत नव्हता. ते डेक्कन कॉलेजमध्ये फेलो या पदावर काम करीत हाते. अचानकपणे याच सुमारास त्यांना राजयक्ष्मा (टी. बी. ) सारखा त्यावेळी असाध्य मानला जाणारा विकार जडला. प्रकृती दुर्बलतेमुळे शिक्षणाची दोन–तीन वर्षे फुकट गेली. पण या घटनेतूनच त्यांची वृत्ती परमार्थाकडे अधिक वळली. इ. स. १९१४ साली त्यांनी तत्त्वज्ञान विषयात एम्. ए. ची पदवी प्रथम वर्गात प्रथम अशा गुणवत्तेने प्राप्त केली.

त्यानंतर डेक्कन कॉलेजची नोकरी सोडून त्यांनी डे. ए. सोसायटीच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये आजीव सदस्य व प्राध्यापक म्हणून नोकरी स्वीकारली. अध्यात्मसाधना आणि अध्यापन दोन्हीही उत्तम रीतीने होत होते. विद्यान असूनही विद्यार्थीप्रिय अशी त्यांची ख्याती झाली. इ. स. १९१६ ते १९१८ च्या दरम्यान त्यांचा लहान मुलगा, पत्नी आणि आई यांचे पाठोपाठ मृत्यू या आघातकारी घटना घडल्या. या आपत्ती म्हणजे अध्यात्माकडे वळण्याचे दैवी संकेत आहेत असे त्यांनी निश्चित वृत्तीने स्वीकारले. प्रकृतीत सुधारणा होण्यासाठी हवापालट म्हणून त्यांची सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजमध्ये बदली झाली होती. तेथे त्यांनी दोन वर्षे अध्यापन केले. इ. स. १९१४ ते १९२४ अशी दहा वर्षे डे. ए. सोसायटीत नोकरी करून त्यांनी संस्थेला त्यागपत्र दिले. वारंवार बिघडणारी प्रकृती, नामसाधनेकडे वाढलेला ओढा आणि संस्थाचालकांशी झालेले मतभेद यातून त्यानी नोकरीचा राजीनामा देण्याचा निर्णय घेतला.

१९२५ साली आपल्या गुरुंच्या स्वप्नातील आदेशानुसार त्यांनी विजापूर जवळच्या निंबाळ या गावी साधकाश्रम स्थापन केला व ते तेथे राहू लागले. या आश्रमाला अध्यात्म विद्यापीठ असे नाव त्यांनी दिले. सातत्याने नामसाधना, गुरुकृपा यांचा परिणाम म्हणून काही साक्षात्काराचे अनुभव (वस्तुदर्शन) त्याना येऊ लागले. त्यांच्या प्रकृतीतही पुष्कळच सुधारणा झाली. या वेळेपर्यंत त्यांचे विपुल ग्रंथलेखन प्रकाशित झाले असल्याने भारत आणि विदेशातील विद्वज्ज्नात त्यांची कीर्ती झाली होती. अलाहाबाद विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरु डॉ. गंगानाथ झा यांनी त्यांना त्या विद्यापीठात तत्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून नोकरी देऊ केली., इ. स. १९२७ ते १९४६ म्हणजे निवृत्त होईपर्यंत त्यांनी तेथे आधी प्राध्यापक आणि नंतर कुलगुरु ही पदे भूषविली. विद्यापीठाने त्यांना त्यांच्या विद्वत्तेचा गौरव म्हणून डी. लिट ही अत्युच्च पदवी सन्मानाने बहाल केली. त्यानंतर ते पुन: निंबाळला आले ते अखेर पर्यंत तेथेच राहिले. १९४७ साली त्यांनी सांगलीच्या तेव्हाच्या श्रीमंत चिंतामणराजे साहेबांच्या उदार सहकार्याने सांगलीला अध्यात्मविद्या मंदिर ही संस्था स्थापली. संस्थेचे मुख्य केंद्र निंबाळच राहिले. अशा रीतीने निंबाळच्या पूर्वीच्या

अध्यात्मविद्यापीठ या संस्थेचे मध्यंतरी खंडित झालेले कार्य पुन्हा सुरु झो. संस्थेचे उद्दिष्ट परमार्थिक असल्याने तत्वज्ञान विषयांवरील चर्चा, परिसंवाद, प्रवचने, संशोधन, ग्रंथ प्रकाशन यासारख्या उपक्रमांद्वारे संस्था समाजाभिमुख झाली. अध्यात्मविद्येचा प्रसार होऊ लागल्याने गुरुदेवाशी सांगलीचे अध्यात्मिक नाते जुळले.
त्यांचा निंबाळ येथील वास्तव्यात त्यांचे साक्षात्कारी पारमार्थिक जीवन अधिकाधिक संपन्न होत गेले. साधनेतून प्राप्त केल्या आत्मिक उर्जेच्या बळावरच चाळीस वर्षे जीवघेण्या आजारावर त्यांनी नियंत्रण ठेवलेच पण त्याही पुढे जाऊन त्यांच्या अखेरच्या दिवसात तज्ज्ञांनी केलेल्या त्यांच्या तपासणीत त्यांचे शरीर पूर्णपणे रोगमुक्त झालेले आढळले. ६ जून १९५७ रोजी पूर्ण निरामय अवस्थेत, साक्षात्काराच्या अत्युच्च समाधीसुखात राहूनच त्यांनी जगाचा निरोप घेतला. त्यांचे परात्पर गुरु निंबरजी महाराज यांच्या कन्नड उक्तीनुसार 'हे देवा, तू ज्या शुद्ध अवस्थेतील शरीर मला दिलेस त्याच अवस्थेत ते मी तुला परत करीत आहे.' असेच जणू काही गुरुदेवानी सूचित केले.

गुरुदेवांची ग्रंथसंपदा : आपल्या अध्ययन आणि अध्यापन काळात त्यांनी विपुल लेखन केले. अनेक विषयावर स्फूट लेख आणि निबंध लिहिले. त्यांचे बहुतेक लेखन इंग्रजीत आहे. पाश्चात्य तत्ववेत्ता कार्लाईल याच्यावरील ग्रंथ प्रथम १९१६ मध्ये प्रसिद्ध झाला. त्यानंतर उपनिषदे, गीता, वेदांत यावरील संशोधनात्मक ग्रंथ, भारतीय तत्वज्ञानाचा इतिहास, मराठी तसेच हिंदी व कन्नड संतांच्या अध्यात्मिक अनुभवावरील साक्षेपी ग्रंथ, परमार्थावर व्याख्याने, अध्यात्मग्रंथमाला, परमार्थ सोपान असे त्यानी विविधांगी लेखन केले. या लेखनामागील प्रेरणा पारमार्थिक अनुभवांचा तौलनिक अभ्यास साक्षात्कारी पुरुषांच्या जीवन चरित्रांचे परिशीलन करण्याची होती.

गुरुदेवांचे अध्यात्म विचार : त्यांचे अध्यात्म त्यानी स्वत: घेतलेल्या साक्षात्कारी अनुभवातून उत्क्रांत झाले आहे. त्या अनुभूतीला ते आत्मसाक्षात्कार किंवा मिस्टिसिझम असे म्हणतात. पारंपारिक भारतीय दर्शनांमध्ये आणि द्रष्ट्या ऋषिमुनींच्या आध्यात्मिक अनुभवात हीच संकल्पना अनुस्यूत आहे. गुरुदेवानी तिचा विज्ञानाच्या विश्लेषणात्मक परिभाषेत विस्तार केला. अंडरहिल यांच्या मिस्टिसिझम या ग्रंथाचे विद्यार्थीदशेतच सखोल वाचन केल्यावर या शब्दाने त्यांच्या मनाची पकड घेतली. त्यांच्या मते मिस्टिसिझम म्हणजे मिस्टरी नव्हे. मिस्टरी या शब्दात अनाकलनीयता, गूढता अभिप्रेत असते. अध्यात्मिक साक्षात्कार ही गूढ व चमत्कृतिपूर्ण अवस्था नाही. तशी ती मानल्यास भोळ्या भाविक समाजाच्या अतिश्रध्दाळू पणाचा गैरफायदा एखादा भोंदू–दांभिक अध्यात्म करणारा माणूस होऊ शकतो. अशा ठिकाणी चमत्कार, बुवाबाजी, व्यक्तिपूजा, अध्यत्मिक वारसदारी अशा परमार्थाला बदनाम करणाऱ्या धोकेदायक घटना घडू शकतात. त्यामुळे विवेकी व्यक्तीने त्यापासून सावध राहणे योग्य.

आत्मानुभव ही गूढ विद्या नसून प्रकट विद्या आहे. आग्रहवादी आणि तथाकथित पुरोगामी विचारसरणीच्या लोकांना असे साक्षात्कारी अनुभव म्हणजे कल्पनेचे खेळ म्हणूनच थोतांड वाटू शकतात. गरुदेवांच्या मते असे अनुभव हे आत्मनिष्ठ असले तरी निखळपणे सत्य असतात. मात्र तत्वज्ञानातील खंडनमंडनाच्या तर्कशुद्ध मांडणीने त्यांचा खरेखोटेपणा सिद्ध करता येत नाही. स्वत: तत्वज्ञानातील गाढे विद्वान असूनही त्यानी एके ठिकाणी म्हटले आहे की, 'फिलॉसॉफी इज दि ग्रामर ऑफ मिस्टिसिझम' अध्यात्मविद्या ही आधुनिक विज्ञानाप्रमाणे अनुभवप्रामाण्य हीच सत्याची कसोटी मानते. गुरुदेवांचे वैशिष्ट्य हे आहे की त्यांनी पारमार्थिक आत्मानुभवाला विज्ञानाच्या निखळ अनुभववादी आणि बुद्धिवादी पायावर सुप्रतिष्ठित करण्याचा आग्रह धरला. त्यानी स्वत: जीवशास्त्र, मज्ञाशास्त्र या प्रगत शास्त्रांचा अभ्यास केला होता. आत्मानुभवाच्या सखोल संशोधनाकरिता इलेक्ट्रॉन, प्रोटॉनच्या धर्तीवर स्पिरिटॉन (चिणुकण) हा अभ्यास विषय असावा असे सुचवले होते. त्यांच्या एका न्यूरॉलॉजिस्ट साधकाजवळ ते म्हणाले होते की मेंदूतील व्हेंट्रिकल्स आणि आत्मानुभवाची स्थिती यांच्या परस्पर संबंधावर आधुनिक विज्ञानाने

संशोधन केले पाहिजे. साक्षात्कारातील आत्मनिष्ठ अनुभवांची सिद्धता विज्ञानाच्या वस्तुनिष्ठ कसोटीवर केली पाहिजे ही गुरुदेवांची प्रागतिक विचारसरणी अध्यात्म व विज्ञान यात सुसंवाद साधणारी वाटते.

साक्षात्काराचे स्वरुप व मार्ग : आत्मसाक्षात्कार साधकाला ईश्वराचे म्हणजेच आत्म्याचे, चैतन्यशक्तीचे स्पष्ट व प्रत्यक्ष दर्शन घडवणारा असतो. यालाच वस्तुदर्शन म्हणतात. त्यांचा ईश्वर हा सगुण साकार मूर्तिरूपात सामावलेला नसून निर्गुण आत्मस्वरूपात आहे. आत्मसाक्षात्काराला संप्रदाय, धर्म, जातपात, लिंग, विद्वत्ता अशी कोणतीही संकुचित कुंपणे नसतात. जगातील सर्व साक्षात्कारी संतांचे पारमार्थिक अनुभव आणि वस्तुदर्शन सारख्याच प्रकारचे असते. गुरुदेवांचे काही नामधारक परधर्मीय होते. त्यांच्या साक्षात्कारवादाला विशाल वैश्विक परिमाण आहे.

भक्तिमार्ग : ज्ञानयोग व कर्मयोग साक्षात्कार मार्गासाठी आवश्यक ती मानसिक, वैचारिक बैठक घडवतात. पण प्रत्यक्ष साक्षात्कारांचा अनुभव भक्तिमार्गानेच येऊ शकतो. अंत:करणात देवाविषयी उत्कट प्रेम, त्याच्या दर्शनाची तीव्र ओढ यामुळे भक्तिभाव जागृत होतो. पारमार्थिक अनुभव येण्यासाठी भक्तीची चार अंगे महत्त्वाची आहेत १. शुद्ध नैतिक आचरण – म्हणजे परस्त्री व परद्रव्य या गोष्टी सर्वस्वी त्याज्य करणे. २. सत्संग– संत चरित्रांचे परिशीलन, त्यांच्या उपदेशांचे भक्तिभावाने श्रवण, पारमार्थिक शंका निरसन, साधकांच्या अनुभवांची देवाणघेवाण यासाठी परमार्थी लोकांच्या बैठका भक्तिमार्गाच्या वाटचालीत आवश्यक आहेत. ३. अधिकारी सद्‌गुरुकडून 'सबीज नाम' प्राप्त करणे. साधकाला ईश्वर प्राप्तीचा रोकडा अनुभव देण्याचे सामर्थ्य फक्त 'सबीज नामा'तच असते. त्यासाठी गुरुकृपा व गुरुवरील साधकाची अढळ निष्ठा महत्त्वाची ठरते ४. सातत्याने आणि चिकाटीने अधिक काळ 'सबीज' नामाचे स्मरण (नेम) करणे.

गुरुदेवांचा भक्तिमार्ग कबीरांच्या निर्गुणी परंपरेची जवळीक साधणारा आहे. सर्व सामान्याना आकर्षित करणारी सगुण भक्तीची बाह्य साधने म्हणजे पूजाअर्चा, उपास, व्रतवैकल्ये, अभिषेक, होमहवन यांना गुरुदेवांच्या भक्तिमार्गात फारसे स्थान नाही. साक्षात्कारी संत तुकाराम सगुण विठ्ठलाचे उपासक असूनही त्यांच्या अभंगाना गुरुदेवांच्या भक्तिमार्गात अतिशय महत्त्व आहे. कारण तुकारामांचे अभंग म्हणजे त्यांच्या आत्मसाक्षात्कारी अनुभवांचे प्रतीके आणि प्रतिमारूपातील वर्णनच आहे. संतांची भजने भक्तिभावाने गाणे, देवाच्या नामघोषात तल्लीन होणे ही सामुदायिक भक्ती तर अखंड नामस्मरण म्हणजे वैयक्तिक भक्ती होय.

गुरुदेव रानडे या विसाव्या शतकातील विलक्षण बुद्धिमान साक्षात्कारी संताचे अध्यात्म हे निर्गुण भक्तिमार्गी असूनही विज्ञाननिष्ठ आहे हे विशेष. म्हणूनच अध्यात्मगगनातील तळपता चित्सूर्य या शब्दात त्यांचे यथार्थ वर्णन करावेसे वाटते.